# राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालयात 'अँड्रॉइड' कार्यशाळेचे आयोजन

आंबव येथील राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये दि. ०३/०९/२०१८ ते ०४/०९/२०१८ रोजी 'अँड्रॉइड' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या कार्यशाळेमध्ये तृतीय वर्ष संगणक अभियांत्रिकी विभागात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना सदर विषयाचे प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यशाळेमध्ये डेल्व्हिक अँप्स चे मॅनेजींग डायरेक्टर अमित थूल व वेकान एज्युकेशनल ऑर्गनायझेशनचे सी.इ.ओ. गौरव सिंग या तज्ञांचे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

प्रास्ताविक करताना संगणक विभागप्रमुख प्रा. मुश्ताक गडकरी यांनी कार्यशाळेचा उद्देश विस्तृतपणे स्पष्ट केला. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेश भागवत म्हणाले कि आजच्या काळात अभियांत्रिकीचा सध्याचा अभ्यासक्रम आणि माहिती तंत्रज्ञानावर काम करणाऱ्या कंपन्यांना लागणारी कौशल्ये यांचा समनव्य साधण्याचा प्रयत्न करणे आवश्यक बनले आहे. त्यासाठीच “आऊटकम बेस्ड एज्युकेशन” या संकल्पनेवर आधारित प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांवर जास्तीत जास्त भर देण्याचा राजेंद्र माने अभियांत्रिकी महाविद्यालय प्रयत्न करीत आहे. त्यांनी डेल्व्हिक अँप्स या कंपनी बरोबर महाविद्यालयाने सामंजस्य करार केल्याचे यावेळी प्रामुख्याने नमूद केले.

सदर कार्यशाळेमध्ये अँड्रॉइड अँप कसे तयार केले जाते याचे सहभागी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. त्यांनी अत्यंत सोप्या आणि सुलभ पद्धतीने मुलांना अँड्रॉइडची प्रात्यक्षिके करुन दाखवली. संगणक विभागातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.

कार्यशाळेचे नियोजन समन्वयक प्रा. मनिष प्रभू तसेच विभागप्रमुख प्रा. मुश्ताक गडकरी यांनी केले. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी विभागीय प्राध्यापक व कर्मचा-यांचे सहकार्य लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महेश भागवत यांनी या कार्यशाळेच्या यशस्वी नियोजनाबद्दल सर्वांचे अभिनंदन केले.